ORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

19740

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अन्वये (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य महाराष्ट्र ......, जिल्हा मुंबई ......, पोलीस ठाणे लाप्रवि मुंबई, पहिली खबर क्र. ३२ ......, वर्ष २०२४, दिनांक २८/१०/२०२४
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रति. अधिनियम १९८८, कलमे Sections ......
(ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : वार २१/०६/२४ तारीख पासून ......, वेळ ......, तारीख पर्यंत २३/०८/२४ पर्यंत वेळ ......
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख २१/०६/२०२४ ......; वेळ १६:०० वा.
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. २२/२४ ......, तारीख २८/१०/२०२४, वेळ १६:३०
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी अर्ज ......, लेखी / तोंडी Written / Oral ......

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा वनराई पो. ठाणे, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ......
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव वनराई पो. ठाणे, ठिकाणाचे नंबर गोरेगाव (पू) गल्ली मुंबई ......, रस्त्याचे नाव ......
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ......, गाव ......, पोस्ट ......, तालुका मुंबई ......, जिल्हा मुंबई ......, राज्य महाराष्ट्र
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name राहुल सुभाषप्रसाद मिश्रा ...... (b) वडीलाचे / पतीचे नाव सुभाषप्रसाद मिश्रा ......
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ३० वर्षे ...... (d) राष्ट्रीयत्व भारतीय ...... फोन नं. ८०२१९८६८८९
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ...... दिल्याचा दिनांक ...... दिल्याचे ठिकाण ...... (f) व्यवसाय ॲडव्होकेट कलर्क (नोकरी)
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू ......, जात Caste ब्राह्मण ......, जनजात Sub-Caste ......
(h) पत्ता : ...... गल्ली / सर्वे नं. ...... घर / नाव नंबर ...... फोन / मो. नंबर ...... पॅन नं. ...... वोटर्स नं. ......
Address : फ्लॅट क्र. २०१, साई अमृत सोसायटी, आरे रोड, नेस्को Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Voter's Card No.
रस्त्याचे नाव ...... जवळचे प्रसिद्ध ठिकाण ...... गाव ...... पोस्ट ...... पो. स्टे. ......
Road जयप्रकाश नगर Nearest identifiable place गोरेगाव (पूर्व) Village मुंबई Post P. Stn. वनराई
तालुका ...... जिल्हा ...... राज्य ...... सध्याचा पत्ता ......
Taluka Distt. मुंबई State महाराष्ट्र Present Address वर नमूद प्रमाणे

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

संगमेश्वर आंबाळे, पोलीस उप निरीक्षक, वनराई पो. ठाणे, मुंबई

Scanned with OKEN Scanner

फिर्यादि

श्री. राहुल सुभाषप्रसाद मिश्रा, वय -30 वर्षे, धंदा - नोकरी ॲडव्होकेट क्लर्क, रा.ठि - फ्लॅट नं 501, साई अमृत सोसायटी, आरे रोड, पेरु बाग, जयप्रकाश नगर, गोरेगाव (पु) मुंबई. यांचा सविस्तर जबाब स्वतंत्र कागदावर घेण्यात आला असुन त्यास गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

Rahul Subhashprasadmishra
28/10/2024

समक्ष

(प्रमोद सुर्वे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई.

फिर्याद दिनांक २८/१०/२०२४

श्री. राहुल सुभाषप्रसाद मिश्रा, वय ३० वर्षे, धंदा-ॲडव्होकेट क्लार्क(हायकोर्ट मुंबई), रा.ठी. ४०१, साई अमृत सोसायटी, आरे रोड, जयप्रकाश नगर, गोरेगाव (पुर्व), मुंबई ४०००६३ मोबाईल नंबर ७०२१८६७९८७

मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर मी माझे कुटुंबासह राहणेस आहे. मी सध्या मुंबई हायकोर्टात वकील प्रकाश धोपटकर यणंचे मदतनीस (ॲडव्होकेट क्लार्क) म्हणुन गेली दोन वर्षे काम पाहत आहे. माझे लहानपणापासुन मुंबईमध्ये वास्तव्य असून मला मराठी वाचता व बोलता येते. तसेच मी बाहेरील खाजगी लोकांची नोटरी, अर्ज टायपिंग व ईतर किरकोळ कामे करुन देत असतो. मालाड येथे राहणारे मुकेश हरिराम कन्नौजिया यांना मी ओळखतो. त्यांचे आरे रोड गोरेगाव येथे मेडीकल स्टोअर असल्याचे मला माहीत आहे. एक दिवशी ते माझेजवळ आले व मला सांगीतले की मला जय माँ शारदा को.ऑप.क्रेडीच सोसायटी लि. याचे नावे वनराई पोलीस ठाणे गोरेगांव येथे एक तक्रार दयायची असुन मला मदत करा असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना सविस्तर हकीकत विचारली असता त्यांनी सांगीतले की, मुकेश कन्नौजिया यांनी मनोज छोटेलाल शर्मा या व्यक्ती कडुन जय माँ शारदा को.ऑप.क्रेडीच सोसायटी लि. मध्ये दिनांक ११/०५/२०२२ रोजी बचत खाते सुरु केले होते. दर दिवशी प्रत्येकी रु.२००/- या हिशोबाने त्यांनी दिनांक ३०/०८/२०२२ पर्यंत रु.२७,८००/- भरले. परंतु नंतर त्यांना रु.२०,०००/- अचानक गरज लागल्याने त्यांनी मनोज शर्मा याला त्यांनी केलेल्या बचतीतुन रु.२०,०००/- देण्यास सांगीतले. परंतु सदर व्यक्ती उडवाउडवीची उत्तरे देवुन पैसे देण्यास टाळाटाळ करु लागल्याने मुकेश कन्नौजिया यांना शंका आली तेव्हा त्यांनी जय माँ शारदा को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि. ऑफिस मध्ये फोन करुन चौकशी केली असता मनोज शर्मा याने मुकेश कन्नौजिया नावाच्या कोणाही व्यक्तीचे खाते त्यांच्या सोसायटीमध्ये नसून त्यांचे पैसे जय माँ शारदा को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि. मध्ये भरले नसल्याची माहिती मिळाल्याने मुकेश कन्नौजिया यांची खात्री पटली की मनोज छोटेलाल शर्मा याने त्यांची फसवणुक केली असल्याबाबतची हकीकत मुकेश कन्नौजिया यांनी मला सांगीतल्यानंतर त्यांनी सांगीतल्याप्रमाणे एक तक्रार अर्ज मी मुकेश कन्नौजिया यांना तयार करुन दिला. सदरचा अर्ज त्यांनी दिनांक ०९/०३/२०२३ रोजी वनराई पोलीस ठाणेस दिला.

त्यानंतर मुकेश कन्नौजिया याने सदर काम करण्याकरीता त्यांना टाईम नसल्याने व त्यांना कायदयातील पुर्ण ज्ञान नसल्याने पुढील कामासाठी मला ऑथोरिटी लेटर दिले. त्यावेळी मी स्वत: वनराई पोलीस ठाणेस जावुन सदर अर्जावर काय कारवाई केली या संदर्भाने चौकशी केली असता सदरचा अर्ज हा पोलीस उपनिरीक्षक(पीएसआय) संगमेश्वर अकाळे यांचेकडे चौकशीकरीता असल्याचे मला समजले. तेव्हा मी त्यांना जावुन भेटलो असता ते सुद्धा सदर अर्जावर कारवाई करणेकरिता टाळाटाळ करु लागले व गुन्हा दाखल करण्यासाठी पैशाची मागणी करु लागले. म्हणुन माझे अशील व मित्र मुकेश कन्नौजिया यांनी दिनांक १७/१०/२०२३ रोजी व दिनांक ०८/०५/२०२४ रोजी पुन्हा वनराई पोलीस ठाणेस वरील घटनेबाबत तक्रारी अर्ज दिला. परंतु तरीसुद्धा पीएसआय अकाळे यांनी सदर अर्जावर कारवाई केली नाही. तेव्हा मी दिनांक १७/०७/२०२४ रोजी पीएसआय अकाळे यांचेकडे ते रात्रीपाळीवर कर्तव्यावर असताना सदर अर्जावर केलेल्या कारवाईची चौकशी करणेकरीता गेलो असता पीएसआय अकाळे यांनी माझेकडे सदर अर्जामध्ये गुन्हा दाखल करण्यासाठी रु. ५०००/- इतकी रक्कम द्यावी लागेल असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना माझे मित्र मुकेश कन्नौजिया याची परिस्थीती सांगुन पैसे न घेण्याची विनंती केली, परंतु त्यांनी पैसे दिल्याशिवाय सिव्हील मॅटरमध्ये गुन्हा दाखल होत नाही असे मला सांगीतले.

माझे मित्र मुकेश कन्नौजिया यांची व माझी पैसे देण्याची इच्छा नसल्याने मित्र मुकेश कन्नौजिया याने वनराई पोलीस ठाणेस केलेल्या अर्जाबाबत कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार लेखी पत्राद्वारे (ऑथोरीटी

Scanned with OKEN Scanner

लेटर) मला दिल्याने मी दिनांक १९/०७/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो. मी सदरचा इंग्रजीत टंकलिखीत केलेली तक्रार अर्ज पोनि सुर्वे यांचेकडे माझी सही करुन सुपुर्द केला. सोबत माझे अशिल व मित्र मुकेश कन्नौजिया याने वनराई पोलीस ठाणेस वेळोवेळी केलेल्या तक्रारी अर्जाची झेरॉक्स प्रत सादर केली.

नंतर पोनि सुर्वे यांनी माझी उपस्थित दोन शासकीय पंचांशी ओळख करुन दिली व त्यांना मी इंग्रजीत टंकलिखीत केलेला तक्रारी अर्ज वाचण्यास दिला. सदर अर्ज वाचल्यानंतर पो.नि. सुर्वे व दोन्ही पंचांनी त्यावर सही केल्यानंतर सदर अर्ज पो.नि. सुर्वे यांनी स्वत:जवळ ठेवून अर्जाचे अनुषंगाने पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणीकरीता लोकसेवक यांच्या कार्यालयात जाण्यापुर्वी तपासी अधिकारी यांनी मला व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. तदनंतर पो.नि. सुर्वे यांनी माझे, पंचाचे व स्वत:चे वक्तव्य व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले.

त्यांनतर पो.नि.सुर्वे यांच्या सुचनेवरुन मी, पो.नि. सुर्वे, दोन्ही पंच, व सापळा पथक असे सरकारी गाडीने संध्याकाळी १८.१५ वा वनराई पोलीस ठाणेपासुन काही अंतरावर जावुन थांबलो. पो.नि. सुर्वे यांनी माझे शर्टाच्या आतील बाजुस बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावुन वनराई पोलीस ठाणे येथील लोकसेवक पीएसआय संगमेश्वर अकाळे यांची भेट घेण्याकरीता पाठविले. त्यावेळी मी पंचासोबत लोकसेवक पीएसआय अकाळे यांना भेटण्यासाठी वनराई पोलीस ठाणेस गेलो. त्यावेळी पीएसआय अकाळे तेथे नसल्याने मी त्यांना माझे मोबाईलवरुन फोन केला असता ते थोडया वेळात पोलीस ठाणेस येत आहेत असे सांगीतले. तेव्हा मी व पंच थोडावेळ पोलीस ठाणे आवरात थांबलो. थोडया वेळाने पीएसआय अकाळे वनराई पोलीस ठाणेस आले असता मी त्यांना माझे मित्र व अशील मुकेश कन्नौजिया यांनी केलेल्या तक्रारी अर्जासंदर्भात विचारले असता '' **ऐसा नही चलेगा -सिव्हिल मॅटर में हाथ डालता ही नही कोई-ये कुछ मॅटर नही मेरे पास साडेचार करोड का मॅटर है- सिव्हिल मॅटर में हाथ नही डालता''** - असे म्हणाले. नंतर पीएसआय अकाळे यांनी मला '' **नही उसका नही बोलुंगा मै आपको अमाऊंट. ठिक है तुम आधा दे दो- कोई बात नही है''** असे म्हणाले. त्यावर मी त्यांना **''तो ढाई''** असे बोललो असता त्यांनी '' **चलेगा, चलेगा''** असे म्हणुन पंचासमक्ष सहमती दर्शवली. तेव्हा मी पीएसआय अकाळे यांना मी परवा येतो असे म्हणुन वनराई पोलीस ठाणेचे बाहेर येवुन पंचासोबत पोनि सुर्वे व पोलीस स्टाफ वाहन लावुन थांबलेल्या ठिकाणी आलो.

त्यानंतर सरकारी वाहनामध्ये पोनि सुर्वे यांनी शासकीय पंचांसमक्ष माझे व लोकसेवक पीएसआय अकाळे यांचेमधील झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डर ऑन करुन ऐकले असता लोकसेवक श्री. संगमेश्वर अकाळे यांनी माझ्याकडे अडीज हजार रुपये (२५००/-) लाच रक्कमेची स्पष्ट मागणी केली असुन सदरची रक्कम दोन दिवसांनी घेवुन येण्यास सांगितले असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर मी, पंच व पोलीस स्टाफ शासकीय वाहनाने ला.प्र.वि कार्यालयात परत आलो. नंतर मी सोमवार दिनांक २२/०७/२०२४ रोजी पीएसआय अकाळे यांना फोन लावुन येण्याबाबत विचारले असता त्यांनी ते ट्रेनिंगकामी बाहेर असुन आल्यावर मला कॉल करतो असे सांगीतले. सदरची बाब मी पोनि सुर्वे यांचे कानावर घातली. तेव्हा पीएसआय अकाळे ट्रेनिंग वरुन वनराई पोलीस ठाणेस परत आल्यानंतर सापळा कारवाई करायची असे ठरले.

परंतु पीएसआय अकाळे यांचा फोन न आल्याने मी स्वत: दिनांक ३१/०७/२०२४ रोजी त्यांना फोन केला असता त्यांनी मला रात्री पैसे घेवुन वनराई पोलीस ठाणेस बोलवले. सदरची बाब मी पोनि सुर्वे यांना सांगीतली. तेव्हा त्यांनी मला ला.प्र.वि. कार्यालयात येण्यास सांगीतले. तेव्हा मी ला.प्र.वि कार्यालयात आल्यानंतर सायंकाळी पोनि सुर्वे यांनी आज आपण सापळा कारवाई करायची आहे असे सांगुन माझे, पंचाचे

Scanned with OKEN Scanner

व पोनि सुर्वे यांचे सापळा अनुषंगाने वक्तव्य व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर पोनि सुर्वे यांनी मला, पंचांना व पोलीस पथकाला सापळा कारवाई अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही सरकारी वाहनाने वनराई पोलीस ठाणेपासुन जवळ काही अंतरावर जावुन थांबलो. तेथे पुन्हा माझ्या शर्टाच्या आतील बाजुस बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावुन पंचांसह वनराई पोलीस ठाणे येथील पीएसआय संगमेश्वर अकाळे यांची भेट घेण्याकरीता पाठविले. तेथे गेल्यानंतर पीएसआय अकाळे हे मला भेटले. परंतु तेथे त्यांना काहीतरी काम असल्याने त्यांनी मला पंचासमक्ष **''आज रोजी काम असल्याने तुम्ही उदया या बघु कामाच''** असे सांगीतले. म्हणुन मी व पंच शासकीय वाहन थांबुन असलेल्या ठिकाणी आलो. तेथे पोनि सुर्वे यांना मी व पंचांनी घडलेली हकीकत सांगीतली. तसेच पोनि सुर्वे यांनी माझ्या व पीएसआय अकाळे यांचे दरम्यान झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डरद्वारे ऐकले. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि कार्यालयात आलो व पोनि सुर्वे यांनी सदर दिवशीची कार्यवाही स्थगीत केल्याचे सांगून उद्या पुन्हा सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगीतले.

त्यानंतर माझे वैयक्तीक कामांमुळे मला २-४ दिवस कारवाई करता येता येत नसल्याचे मी पोनि सुर्वे यांना सांगीतले. नंतर मी एके दिवशी पीएसआय अकाळे यांना भेटण्यासंदर्भाने बोलण्यासाठी कॉल केला असता त्यांनी माझा कॉल ब्लॉक केल्याचे मला समजले. तेव्हा मी त्यांना त्यांचे व्हाट्स अप ला मेसेज टाकला. परंतु त्यांनी त्यालासुद्धा रिप्लाय दिला नाही. म्हणुन मी सदरची बाब पोनि सुर्वे यांना सांगीतली. तेव्हा त्यांनी मला दिनांक १३/०८/२०२४ रोजी ला.प्र.वि कार्यालयात बोलाविले असता मी सदर ठिकाणी गेल्यावर सर्वानुमते पीएसआय अकाळे यांना भेटण्यास जाण्याचे ठरले. त्यानंतर मी, पोलीस पथक व कार्यालयात उपलब्ध पंच असे ला.प्र.वि कार्यालयातुन शासकीय वाहनाने निघुन वनराई पोलीस ठाणेपासुन काही अंतरावर असलेल्या ओबेरॉय मॉलचे पार्कीगमध्ये कुणाला संशय येवु नये म्हणुन थांबलो.

तेथे पुन्हा माझ्या शर्टाच्या आतील बाजुस बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावुन पंचासह वनराई पोलीस ठाणे येथील लोकसेवक पीएसआय संगमेश्वर अकाळे यांची भेट घेण्याकरीता पाठविले. तेथे गेल्यानंतर पीएसआय अकाळे हे मला भेटले. त्यावेळी पंच निकम हे थोडया अंतरावर थांबले होते. तेथे पीएसआय अकाळे यांनी मला माझे अशील कनौजिया यांनी पोलीस ठाणेस दिलेल्या तक्रार अर्जातील गैरअर्जदार यांचा त्यांना (पीएसआय अकाळे) यांना मेसेज आला होता व ते तुमचे पैसे देणार आहेत असे सांगीतले. व ईतर बाबींवर चर्चा करुन तुमचे काम होउन जाईल तुम्ही जावा असे म्हणाले व गडबडीत त्या ठिकाणावरुन निघुन गेले. म्हणुन मी व पंच शासकीय वाहन थांबुन असलेल्या ठिकाणी आलो. तेथे पोनि सुर्वे यांना मी व पंचांनी घडलेली हकीकत सांगीतली. तसेच पोनि सुर्वे व सपोआ बाबर यांनी माझ्या व पीएसआय अकाळे यांचे दरम्यान झालेले संभाषण व्हाईस रेकॉर्डरद्वारे ऐकले. त्यानंतर आम्ही ला.प्र.वि कार्यालयात आलो व पोनि सुर्वे यांनी सदर दिवशीची कार्यवाही स्थगीत केल्याचे सांगीतले.

दिनांक ३१/०७/२०२४ व दिनांक १३/०८/२०२४ रोजी लोकसेवक पीएसआय संगमेश्वर अकाळे यांचेशी प्रत्यक्ष भेटीदरम्यान झालेल्या चर्चेनंतर तसेच त्यांचे सोबत फोनवर झालेले संभाषण, त्यांचे वर्तन व बोलण्याचे हावभाव याचेवरुन लोकसेवक पीएसआय संगमेश्वर अकाळे यांनी माझेकडे दिनांक १९/०७/२०२४ रोजी भेटिदरम्यान मागणी केलेले रु. अडीच हजार (ढाई हजार/२५००) ते स्विकारतील याची शक्यता वाटत नाही.

तरी पोलीस उप निरीक्षक संगमेश्वर अकाळे, नेमणूक वनराई पोलीस ठाणे, मुंबई यांनी माझे अशील श्री.मुकेश कन्नौजिया यांनी मनोज छोटेलाल शर्मा यांचेविरुध्द त्यांची फसवणूक केलेबाबत दिलेल्या तक्रारअर्जावर कारवाई करण्याकरीता टाळाटाळ केली तसेच गुन्हा दाखल करण्याकरीता रु.५,०००/- रक्कमेची मागणी केली. माझे मित्र मुकेश कन्नौजिया यांची व माझी लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने व मित्र मुकेश कन्नौजिया याने वनराई पोलीस ठाणेस केलेल्या अर्जाबाबत कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार

Scanned with OKEN Scanner

मला दिल्याने मी दिनांक १९/०७/२०२४ रोजी दिलेल्या तक्रारअर्जाचे अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान पोलीस उप निरीक्षक संगमेश्वर अकाळे यांनी तडजोडीअंती लाचेची रक्कम रु. २,५००/- स्विकारण्याचे कबुल केल्याचे पोलीस उप निरीक्षक संगमेश्वर अकाळे व माझ्या संभाषणातून स्पष्ट झाले आहे. माझी पोलीस उप निरीक्षक संगमेश्वर अकाळे, वनराई पोलीस स्टेशन यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

माझा वरील जबाब मराठीमध्ये टंकलिखीत केला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला असता तो मी सांगीतल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

(प्रमोद सुर्वे)
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Rahul Subhashprasad Mishra

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ..........
Reasons for delay in reporting by the complainant/informant —

चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.
—

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........
Total Value of properties stolen / involved —

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : —
Unnatural / Accidental Death Case No., if any

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील फि. यांचे असील व मित्र श्री. मुकेश कनोजिया यांनी मनोज छोटेलाल शर्मा यांना [illegible] यांची एनसी ९०२/[illegible] केलेबाबत वाकडाई पो. ठाणे येथे दिलेल्या तक्रार अर्जावर कारवाई करून गुन्हा दाखल करण्याकरिता रु. ५००००/- रकमेची मागणी केली. फि. यांचे मित्र यांची पैसे देण्याची इच्छा नसल्याने तसेच श्री. मुकेश कनोजिया यांनी वाकडाई पो. ठाणे मुंबई येथे दिलेल्या अर्जावर कारवाई करण्याचा सर्व अधिकार फिर्यादी यांना दिल्याने "फि" यांनी दि. २१/०६/२०२४ रोजी ला.प्र.वि. मुंबई येथे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान पोलीस उप निरीक्षक सोमेश्वर कमाले यांनी तडजोडी अंती रु. २५०००/- स्विकारण्याचे मान्य केले. म्हणून भ्र.प्र. अधिनियम १९८८ कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद

केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कालम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
पोलीस निरीक्षक प्रमोद प्रकाश खुरे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S .........., District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name .......... प्रमोद खुरे
पदनाम Rank .......... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. .......... ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ..........

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

hment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner